# नोटीस

दिनांक-०९/०८/२०२३

जिल्हा प्रशिक्षण केंद्र सोलापुर या कार्यालया मध्ये आरोग्य विभागातील सर्व आरोग्य सेवा देणारे अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात येतात. सदरील प्रशिक्षणा दरम्यान कार्यालयमध्ये स्वच्छता राखणे व कार्यालयाची सुरक्षा करणे कामी जिल्हा प्रशिक्षण केंद्र सोलापुर येथे खालील तक्यात दर्शविल्या प्रमाणे सफाई कामगार नेमणेकरीता खालील अटी व शर्ती नुसार दरदाम मागणीपत्रक मागवित आहोत.

| अ.क्र | तपशिल | आवश्यक सपोर्ट स्टाफ यांची संख्या | रुपये |
|---|---|---|---|
| १ | सफाई कामगार | १ | |
| २ | सुरक्षा रक्षक | १ | |

**अटी व शर्ती**

१) कार्यालय सुरक्षा रक्षका यांचा कामकाजाचा तपशिल खालील प्रमाणे राहील.

I. कार्यालयाची सुरक्षा हि 12 तास करणे आवश्यक राहील

२) कार्यालय स्वच्छता कामकाजाचा तपशिल खालील प्रमाणे राहील.

I. कार्यालयाच्या आवारात पडलेला किंवा जमा झालेला झाडांचा पालापाचोळा, फांदया,प्लास्टि-ककचरा,घनकचरा गोळा करणे व त्याची योग्यरित्या विल्हेवाट लावणे .

II. कार्यालयातील सर्व बाथरुम व शौचालयाची साफसफाई करणे

III. कार्यालय परिसरातील इमारतीचे सर्व जिने, पॅसेजची साफसफाई, फर्निचर ( संगणक टेबल व खुर्ची ) साफसफाई करणे तसेच कार्यालयातील सर्व जाळया-जळमटे काढणे.

IV. या कार्यालयाची वेळ सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत आहे तरी सफाई कामगार यांनी पुर्ण वेळ कार्यालयात हजर राहणे अनिवार्य आहे.

V. कार्यालय हे प्रशिक्षणाशी निगडीत असल्याणे आवश्यकता असल्यास सदरील कार्यालय हे शासकिय सुटटी च्या दिवशीही चालु राहील.

VI. सफाईकामगार यांचे मानधन हजेरी पत्रकानुसार अदा करण्यात येईल.

३) वरील काम करण्यासाठी कार्यायामध्ये समक्ष येऊन कार्यालयाच्या अंतर्गत व बाहय परिसराची पाहणी करावी. तसेच ही कामे करण्यासाठी ज्या संस्थेकडे अत्याधुनिक यंत्रणा उदा. व्हिल, व्हॅक्युम, क्लिनर, टॉयलेट/बाथरुम स्वच्छ करण्यासाठी प्रेशर हॅण्ड शॉवर इत्यादी साधनसामुग्री उपलब्ध आहेत अशा संस्थांना प्राधान्य देण्यात येईल (साफसफाईसाठी लागणारे साहित्य संस्थेने स्वखर्चातुन आणावे) तसेच बाथरुम व शौचालयाची सफासफाई करण्यासाठी लागणारे इतर साहीत्य (ॲसिड, हारपिक,फिनाईल, डिशवॉश पॉवडर इ.) या कार्यालया मार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल

४) स्वच्छता कामकाज करारानुसार करावयाच्या कामासाठी दरपत्रकातील नमुद दर हे सर्व करासहित असावेत.

५) विहीत मुदतीमध्येच प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारण्यात येतील, अन्यथा नाकारण्यात येतील.

६) दरपत्रकांवरील नमुद केलेल्या दरांमध्ये खाडाखोड अथवा अंक गिरविलेले नसावेत.

७) दरपत्रके सिलबंद स्वरुपात थेट या कार्यालयाकडे पाठविण्यात यावीत.

८) दरपत्रकामध्ये जी.एस.टी व पॅन नंबर इ नमुद करणे बंधनकारक राहील.

९) उपरोक्त प्रमाणे अटि व शर्ती मध्ये बदल किंवा शितील करण्या बाबतचे अधिकार या कर्यालयाने राखुन ठेवले आहे.

१०) दरपत्रकांना प्रतिसाद न मिळाल्यास अथवा त्यामध्ये काही त्रुटी आढळुन आल्यास ही दरपत्रके ( नोटीस ) प्रक्रिया स्विकारणे नाकारणे अथवा रदद करणे इ.अंतिम अधिकार मा. जिल्हा आरोग्य अधिकारी आरोग्य विभाग जिल्हा परिषद सोलापुर यांना राहील.

११) जिल्हा प्रशिक्षण केंद्र सोलापुर या कार्यालया करीता अनुदान प्राप्त झाले नंतरच देयक अदा करण्यात येईल .

१२) सदरील सफाई कामगार हे दिनांक- ३१/०३/२०२४ पर्यंत वैध राहील.

उपरोक्त प्रमाणे कार्यालयीन परिसर स्वच्छता करणेसाठी इच्छुक असल्यास उपरोक्त नमुद अटी व शर्ती प्रमाणे आपले दरपत्रक **<u>वैद्यकीय आधिकारी जिल्हा प्रशिक्षण केंद्र जुने वैद्यकीय महाविद्यालय आवार, गुरुनानक चौक, सोलापुर</u>** या कार्यालयास ही नोटीस ( सुचना ) संकेतस्थळावर प्रसिध्द होताच ७ दिवसाच्या आत बंद लखोटयामध्ये दिनांक:-०९/०८/२०२३ ते दिनांक:-29/०८/२०२३ पर्यत कार्यालयीन वेळेत सादर करण्यात यावे मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या दरदाम पत्रकांचा विचार केला जाणार नाही. (सुट्टीचे दिवस वगळून)

जिल्हा प्रशिक्षण केंद्र सोलापुर येथे सादर केलेले दरदामपत्रके दिनांक :-22/०८/२०२३ रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद सोलापुर यांच्या निजी कक्षामध्ये सकाळी ठिक ११.०० वाजता उघडण्यात येईल.

<u>दरपत्रकासोबत खालील प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे अन्यथा आपले दरपत्रक ग्राहय धरले जाणार नाही.</u>

**१) व्यवसायधारकाने अधिकृत व्यवसाय करत असल्याचे प्रमाणपत्र ( शॉप ॲक्ट लायसन )**

**२) संस्थेचे पॅन कार्ड प्रमाणपत्र**

**३) संस्थेचे जी.एस.टी प्रमाणपत्र**

**४) व्यवसाय कर भरणा प्रमाणपत्र**

**५) ई.पी.एफ रिर्टन प्रमाण्पत्र**

**६) वरील सर्व प्रमाणपत्रांचे सत्यप्रती साक्षांकित करुन दरपत्रकासोबत सादर करण्यात यावेत.**

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद सोलापुर